ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २ सप्टेंबर, १९५३ अंक ३५

## विविध माहिती

**भारतामधील खनिजांचें उत्पादन**—१९५० सालीं भारतांत पेट्रोल सोडून इतर खनिजांचें जें उत्पादन झालें त्याची किंमत ८३ कोटी रुपये झाली. १९४९ सालीं ७४ कोटी रुपये किंमतीचीं खनिजें उत्पादन करण्यांत आलीं होतीं. अभ्रक, सोनें, मँगेनीज आणि इमारतींना लागणारा माल ह्यांच्या उत्पादनांत वाढ झाल्यामुळें वरील फरक पडला. अभ्रक आणि मँगनीज ह्यांना परदेशी बाजारपेठा चांगल्या लाभल्या. १९५० सालीं खाणींच्या व्यवसायांत रोज ५,४४,०७३ माणसें काम करीत होतीं. १९४९ सालीं त्यांची संख्या ५,१८,८५२ होती.

**लॉर्ड लिनलिथगो ह्यांची मालमत्ता**—हिंदुस्थानचे एक माजी व्हॉइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं आपल्या मागें अवघी ५०० पौंडांची मालमत्ता ठेवली, असें समजतें. ब्रिटनमधील मिडलंड बँकेचे चेअरमन म्हणून त्यांना वार्षिक १५,००० पौंड तनखा मिळत असे.

**मक्केला रशिअन यात्रेकरू**—मक्केच्या यात्रेला सोव्हिएट रशिआंतील मुसलमान नागरिकांपैकी ३,००० नागरिक ह्या वर्षी गेले होते, असें समजतें. गेल्या कित्येक वर्षांत रशिआंतून एवढ्या मोठ्या संख्येनें मुसलमान यात्रेकरू जाणाचा हा पहिलाच प्रसंग आहे असें म्हणतात.

**कराची येथें चित्रपट-प्रदर्शन**—डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कराची येथें पाकिस्तानी व भारतीय चित्रपटांचें एक प्रदर्शन भरविण्यांत येणार असल्याचें समजतें. ह्याच प्रसंगीं नृत्य, संगीत आणि क्रिकेट ह्यांचेहि कांहीं कार्यक्रम होणार आहेत. एक चित्रपट परिषद भरविण्यांत येणार असून तिला दोन्ही देशांतील कांहीं प्रमुख व्यक्ती हजर राहणार आहेत.

**भारतीय रत्नांना मागणी**—भारतीय रत्नांना परदेशांत चांगली मागणी येत असल्यानें गेल्या दोन वर्षांत त्यांची निर्यात पांच पटीनें वाढली आहे. १९५० सालीं ५,९६,४७२ रुपये किंमतीचे खडे परदेशीं पाठविण्यांत आले, तर १९५१ सालीं २२,६८,२८६ रुपये किंमतीचे आणि १९५२ सालीं ३२,१७,१२९ रुपये किंमतीचे धाडण्यांत आले. सगळ्यांत अधिक खडे ब्रह्मदेश विकत घेतो. गेल्या वर्षी ब्रह्मदेशानें भारताकडून ९,२८,११३ रुपयांचे खडे विकत घेतले.

**भारत व अणुशक्ति**—भारतांत अणुशक्तीच्या उत्पादनाला उपयोगी पडण्यासारखीं बरींच खनिजें सांपडत असल्याचें डॉ. एस. एस. भटनागर ह्यांनीं एका प्रसंगीं सांगितलें. ह्या खनिजांत मुख्यतः बेरिलिअम, टिटॅनियम इत्यादींचा समावेश होतो. ह्या बाबतींत भारत इतर कांहीं देशांच्या मानानें सुदैवी आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**व्यापारामागून शस्त्रेंहि येणार**—इजिप्तकडून कापूस, मँगेनीज, इत्यादि माल घेऊन त्यांच्या बदला यंत्रसामुग्री आणि शस्त्रें पुरविण्याचा करार रशियानें केला असल्याचें पूर्वी प्रसिद्ध झालेंच आहे. दोन्हीं देश परस्परांना एक अब्ज पौंडांचा माल पुरविणार आहेत. रशिअन शस्त्रें आलीं तर त्यांच्या मागोमाग रशिअन तज्ज्ञहि येतील अशी भीति ब्रिटनमध्यें व्यक्त करण्यांत येत आहे.

**ही वांटणी कशी काय?**—मध्य प्रदेश सरकारच्या पंचवार्षिक कार्यक्रमावर ४८ कोटी रुपये खर्च व्हावयाचे असून त्यांपैकीं दोन कोटी रुपये नवीन रस्ते बांधण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहेत. राज्यांत सध्यां १०,००० मैल लांबीचे रस्ते असून त्यांत १,५०० मैलांची भर पडणार आहे. तथापि नागपूर जिल्ह्यांत फक्त एक मैल लांबीचा नवा रस्ता तयार करण्यांत येणार आहे.

**कलकत्त्याजवळील योजना**—कलकत्त्याजवळ असणारें खाऱ्या पाण्याचें सरोवर बुजवून त्या ठिकाणीं वसाहत करण्याची योजना डच इंजिनिअर्सच्या साह्यानें आंखण्यांत आली आहे. त्यासाठीं जरूर ती परदेशी हुंडणावळ मिळण्यासाठीं प. बंगाल सरकारनें भारतीय सरकारला विनंति केली आहे.

**रेल्वे स्लीपर्सची मागणी**—जमशेटपूर येथील टाटांच्या कारखान्याकडे रेल्वे-बोर्डानें ३०,००० टन वजनाच्या रेल्वे स्लीपर्सची मागणी नोंदविली आहे. १९५३-५४ सालीं बोर्डाचा खरेदीचा जो कार्यक्रम आहे, त्याप्रमाणें वरील मागणी करण्यांत आली आहे. १९५४-५५ सालासाठींहि तितकीच मागणी नोंदविण्यांत आली आहे. दोन्ही मागण्या पुरविण्याचें कारखान्यानें मान्य केलें आहे.

**पडीक जमिनीची लागवड**—आसाम सरकारनें मागासलेल्या जमातीच्या वस्तींतील ५२,४०० एकर पडीक जमीन लागवडीला आणून तींत अन्नधान्याचें उत्पादन करण्याचें ठरविलें आहे. सर्व योजना ५ वर्षांत पुरी व्हावयाची असून तीसाठीं १९·७२ लाख रुपये खर्च येईल.

**४० वयानंतर काम कसें मिळेल?**—गेल्या जून १५ तारखेस ब्रिटनमध्यें १,७५,००० माणसें बेकार होतीं. त्यांपैकीं १,००,००० कामगार ४० वय उलटलेलें होते. ह्या लोकांना लवकर काम तर मिळत नाहींच; पण बेकारींत अधिक काळहि काढावा लागतो. तरुण कामगारांना लवकर कामें मिळतात. केस पांढरे होऊं लागल्यावरहि माणूस चांगलें काम करूं शकतो हें कारखानदारांना पटवून देण्यासाठीं आतां एक संस्था काढण्यांत आली आहे.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें

नारायणगांव येथें पे-ऑफिस दिनांक २२।७।५२ रोजीं मुंबई राज्याचे सहकारी खात्याचे उपमंत्री श्री. बी. डी. देशमुख यांच्या हस्तें उघडण्यांत आलें. दिनांक ३०।६।५३ अखेरच्या सालांत बँकेचा व्यवहार १४ शाखा व ४ उपशाखा यांचेमार्फत चालू होता. बँकेस जोडलेल्या सहकारी पतपेढ्यांची संख्या ७१५ होती. बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनें ठरविलेल्या धोरणाप्रमाणें शेती कर्ज व्यवस्था चालू आहे. त्यामुळें पीक कर्जाच्या रकमेंत दिवसेंदिवस जास्तच वाढ होत आहे. शेतकी सोसायट्यांकडील गेल्या तीन वर्षांचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| | |
|---|---|
| ३०।६।५१ अखेर | रु. ३७,८६,१७२ |
| ३०।६।५२ अखेर | रु. ४७,०६,२२९ |
| ३०।६।५३ अखेर | रु. ४९,८१,०३२ |

बँकेनें ग्रामीण विभागांतील शेतकऱ्यांना सोनें-चांदीच्या तारणावर कर्ज मिळावें म्हणून केलेल्या व्यवस्थेचा फायदा घेणेसाठी शेतकऱ्यांमध्यें नाममात्र सभासद होण्याची संख्या झपाट्यानें वाढत असून अहवालाचे सालांत नाममात्र सभासदांची संख्या १०१५ आहे.

मागील वर्षाप्रमाणें अहवालाचे सालीं पुणें जिल्ह्याच्या पश्चिम भागांतील खेड, आंबेगांव, जुन्नर तसेंच हवेली व घोडनदी या तालुक्यांतील शेतकऱ्यांना बटाटे बियाणेसाठी व खतासाठी रोख रकम न देतां पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघामार्फत मालाचे रूपानें कर्ज पुरविलें. वरील सर्व तालुक्यांतील ५७ सहकारी पतपेढ्यांचे १२७७ सभासदांना सुमारें १२०० एकर क्षेत्रासाठी रुपये ३,९८,२६० कर्ज बियाणा रूपानें पुरविलें.

मंदीची परिस्थिति असतांनाहि बँकेच्या ठेवींत अहवालाचे सालीं रुपये दहा लाखांनीं वाढ झालेली आहे. ठेवीमध्यें होत असलेली वाढ पाहातां बँकेचे भाग-भांडवलांतहि त्याचप्रमाणें वाढ होणें इष्ट आहे हें लक्षांत घेऊन मा. बोर्डानें बँकेचें भांडवल वाढविणेबद्दल नियमांत जरूर ती दुरुस्ती सुचविली आहे.

( चेअरमन : रा. य. बोरकर. मॅ. डायरेक्टर : मो. वि. खडे वा. सभा : १३-९-५३ )

---

### कोणते हिंदी चित्रपट जर्मनींत खपतील?

"कृत्रिम पार्श्वभूमीवर चित्रपट न काढतां, ते खऱ्या हिंदी पार्श्वभूमीवर काढलें व त्यांत नकली नाच न घालतां वास्तवपूर्ण हिंदी नाच घातले, तर हिंदी चित्रपटांना जर्मनींत बाजारपेठ मिळूं शकेल. भारतांतील प्रचंड नद्या, पर्वत, सपाट प्रदेश व अरण्यें, हीं त्या चित्रपटांतून आढळलीं पाहिजेत. दरसाल किमान सहा उत्कृष्ट चित्रपट जर्मनींत पाठविण्यांत आले पाहिजेत, आणि त्यांची लांबी बेताची असली पाहिजे." असें मत UFA-AFIFA ह्या जगप्रसिद्ध जर्मन स्टुडिओच्या एका प्रवक्त्यानें नुकतेंच काढलें.

---

### प्राथमिक शिक्षकाचा विमा सरकारनें उतरवावा

मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षकसंघानें मध्यप्रदेशांतील सुमारें ५० शहरांत "शिक्षक-दिन" पाळला. शिक्षकाचा किमान पगार ७५ रु. असावा, त्याच्या मुलामुलींना शाळेंत व कॉलेजांत शिक्षण मोफत मिळावें, सरकारी दरानें महागाई भत्ता मिळावा, वैद्यकीय उपचाराच्या सोई असाव्यात, प्रत्येक शिक्षकाचा सरकारनें १,००० रु. चा विमा उतरवावा, इत्यादि मागण्या संघानें केल्या आहेत. संघाचे ८,००० शिक्षक सभासद आहेत.

## १९५२-५३ मधील सरकारचें दुष्काळ-निवारण खास-खात्यानें केलेलें कार्य

१९५२ च्या ऑक्टोबरमध्यें मुंबई सरकारनें दुष्काळ-निवारणार्थ करावयाचे कामाची एकसूत्रीपणानें व्यवस्था करण्याकरितां एक विशेष खातें स्थापून त्यावर श्री. एम्. आर. यार्दी, आय्. सी. एस्. ह्यांची नेमणूक केली. तें खातें जुलै १९५३ अखेर बंद करण्यांत येण्याचें सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें. ह्या दहा महिन्यांत ह्या खात्यानें जें कार्य केलें त्याची माहिती महत्त्वाची असल्यामुळें ह्या लेखांत त्रोटकपणें देत आहोंत. ह्या काळांत सर्व मुंबई राज्यांत लहान-मोठ्या ५०७ योजना आंखून सुरू केल्या. ह्यापैकीं ५९ पाणी-पुरवठ्याच्या योजना असून, २७५ जमिनीवर समपातळीवर घातलेल्या बांध-बदिस्तींचीं कामें होतीं. बाकीच्या १७३ योजनांत रस्ते वगैरे इतर कामें होतीं.

मे महिन्याचे शेवटीं दुष्काळाची तीव्रता सर्वांत जास्त भासली. तेव्हां सर्व ठिकाणच्या कामावर एकंदर ३,७०,००० मजूर कामावर होते. पाणी-पुरवठ्याच्या योजनांवर सरकारनें जूनअखेर ८१ लक्ष रुपये खर्च केले. सर्व योजनांच्याकरितां लागणाऱ्या पैशांचा एकंदर अंदाज ४·२० कोटी रुपये करण्यांत आला आहे. ५९ योजनांपैकीं, ३० पाणीपुरवठ्याच्या योजना मध्यवर्ती सरकारनें देऊं केलेल्या ११७ लक्ष रुपयांच्या कर्जांतून करण्यांत आल्या आहेत; बाकीचा खर्च मुंबई सरकार करणार आहे.

पाणी-पुरवठ्याच्या योजना सर्व प्रांतभर पसरलेल्या असून अद्याप त्यांतून पुन्हा कोणत्या करावयाच्या ह्याबद्दल निर्णय झालेला नाहीं. पश्चिम खानदेशला सर्वांत जास्त म्हणजे २२ लक्ष रुपये पाणीपुरवठ्याकरितां मिळाले.

समपातळीवरील बांधामुळें सुमारें २ लक्ष एकर क्षेत्राची धूप थांबून संरक्षण होईल असा अंदाज आहे. २७५ बांधबंदिस्तीच्या कामांपैकीं, ६९ योजना सोलापूर जिल्ह्यांत, ४२ पूर्व खानदेशांत, ३८ विजापूर जिल्ह्यांत, २५ नाशिक जिल्ह्यांत, २१ अहमदनगर जिल्ह्यांत, १८ पुणें जिल्ह्यांत, १४ दक्षिण सातारा, प्रत्येकी ११ पश्चिम खानदेश व पंचमहाल, व बाकीच्या २६ योजना इतर ६ जिल्ह्यांत पसरलेल्या आहेत. मे महिन्याचे शेवटीं ह्या बांध घालण्याचे कामावर १,४७,००० मजूर कामावर होते. जुलै १९५३ च्या आरंभापर्यंत ७,२३४ आगगाडीचे डबे भरून गवत दुष्काळी भागांत रवाना करण्यांत आलें. विशेषतः सोलापूर, पुणें, बेळगांव, नाशिक, सातारा, (दोन्ही), नगर व दोन्ही खानदेश इकडे गवत पाठविण्यांत आलें. ह्या डब्यांतून ३ लक्ष ५७ हजार ८८३ गड्डे गवत रवाना झाले.

( शेतकी आणि शेतकरी )

---

आम्हाला हीं गिऱ्हाइकें नकोतच—डेनमार्कमधील हॉटेल मालकांनीं आपल्या संघटनेतर्फे ३,००० पाहुण्यांची यादी तयार केली आहे. हे पाहुणे आपणांस नकोत असें मालकांचें मत आहे. हे सर्व पाहुणे असे आहेत कीं, त्यांनीं आपलीं बिलें विस्मृतीनें चुकती केलेलीं नाहींत. पाहुण्यांत पुष्कळसे परदेशीय आहेत; पण खोटें नांव व खोटा पत्ता नोंदणारे कांहीं डॅनिश नागरिकहि आहेत. उच्च प्रतीचें हॉटेल-मालक शिष्टाचार म्हणून पाहुण्यांच्या ठावठिकाणांची कसून तपासणी करीत नाहींत. अशा हॉटेल मालकांना विशेष फटका बसला आहे.

अर्थ

बुधवार, ता० २ सप्टेंबर १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## निर्गत व्यापारांतील येण्याचा विमा

### ग्रेटब्रिटनमधील एक्सपोर्ट क्रेडिटस गॅरंटी खात्याचें कार्य

"अर्था"च्या २९ जुलैच्या अंकांतील क्रेडिट इन्शुअरन्स-वरील लेखांत, ग्रेटब्रिटनमधील सरकारी एक्सपोर्ट गॅरंटी खात्याचा उल्लेख आलेला आहे. ह्या खात्याचें संपूर्ण नांव 'एक्सपोर्ट क्रेडिट्स गॅरंटी डिपार्टमेंट' असें आहे. हें खातें ग्रेटब्रिटनच्या निर्गत व्यापाराच्या वृद्धीचे कामीं अधिकाधिक महत्त्वाची कामगिरी बजावीत आहे युद्धापूर्वी ह्या खात्याचे फक्त ३०० विमेदार होते; आतां ३,००० निर्गत व्यापारी त्याचे विमेदार झाले आहेत. व्यापाराची परिस्थिति अधिक बिकट होत चालली असल्याकारणानें व परदेशांची स्पर्धा तीव्रतर झाल्यामुळें निर्गत व्यापाराची चर्चा ग्रेटब्रिटनमध्यें चालू असतांना ए. के. गॅ. खात्याविषयीं बोलणें होणें अटळ असतें, इतकें त्याचें महत्त्व वाढलें आहे. ह्या खात्याच्या कामाची माहिती येथें थोडक्यांत देण्यांत येत आहे.

परराष्ट्रीय व्यापारांतील ज्या धोक्यांची जोखीम दुसरा कोणी पत्करणार नाहीं, ती जोखीम (खरेदीदाराची दिवाळखोरी, दिलेल्या मालाची किंमत खरेदीदारानें न देणें, युद्ध किंवा बंडाळी ह्यामुळें होणारें नुकसान, ग्रेटब्रिटनकडे रक्कम पौंडांचे स्वरूपांत पाठविण्यास खरेदीदाराच्या देशानें केलेली बंदी, इत्यादिमुळें येणारी आपत्ति) हें खातें स्वीकारतें. सध्यां ब्राझीलमध्यें तेथील सरकारनें व्यापारी देणीं देण्यास बंदी केली आहे, त्यामुळें ह्या ब्रिटिश सरकारी खात्याला विमेदारांचें ३·२ कोटी पौंड देणें झालें आहे. कालांतरानें ब्राझीलमधील येणें वसूल होईल. परंतु, विमा न उतरणाऱ्या व्यापारी फर्मला तोंपर्यंत हात जोडून वाट बघत थांबावें लागेल. तथापि ज्या व्यापाऱ्यानें विमा उतरलेला असेल, त्याला ए. के. गॅ. खात्याकडून सहा महिन्यांचे आंत ठरलेली नुकसानभरपाई मिळेल.

कांहीं धोके पत्करणें राष्ट्राच्या हिताचें असतें, असे धोकेहि सरकारी खातें पत्करतें. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिका किंवा लॅटिन–अमेरिकन डॉलर हिशेबाचे देश, ह्यांचेकडे निर्गत वाढविणें ग्रेट-ब्रिटनच्या राष्ट्रहिताचें आहे, म्हणून त्यांतील धोके हें सरकारी खातें स्वीकारते. "डॉलर ड्राइव्ह" पॉलिसींच्या अन्वयें, निर्गत व्यापाऱ्यांना आलेल्या नुकसानीच्या ठराविक भागाची भरपाई सरकारी खातें करतें. बाजारपेठांची पहाणी, जाहिरात, विक्रीची वाढ करण्याच्या योजना, इत्यादींचा खर्च भागविणें निर्गत व्यापा-ऱ्यांना शक्य झालें नाहीं, तर सरकारी खातें त्या नुकसानीचा कांहीं भाग सोसतें.

निर्गत व्यापाऱ्याच्या सर्व निर्गत व्यापाराचा विमा स्वीकारणें, हा विमापॉलिसीचा नेहेमींचा प्रकार आहे. परंतु, फक्त कांहीं बाजारपेठांतीलच व्यापाराच्या धोक्याचा विमाहि व्यापाऱ्यांना मिळूं शकतो. उदाहरणार्थ उत्तर अमेरिका, ब्रिटिश साम्राज्यांतील देश, लॅटिन अमेरिका आणि युरोप ह्यांच्याशीं व्यापार करणारा व्यापारी इच्छेप्रमाणें त्यांतील कांहीं मुलुखांतील व्यापार विमा-पॉलिसींतून वगळूं शकतो. कांहीं बाजारपेठा वगळता आल्या, तरी बाजारपेठांतील फक्त कांहीं व्यक्तींना मात्र वगळतां येत नाहीं.

हप्त्यांची रक्कम ठरवितांना तीन गोष्टी विचारांत घेतल्या जातात:—(१) माल कोणत्या देशाकडे निर्गत व्हावयाचा, (२) मालाचा प्रकार कोणता आहे, आणि (३) मालाची किंमत मिळण्याच्या अटी कोणत्या आहेत. ज्या देशांकडे माल पाठवावयाचा, त्यांची सहा गटांत प्रतवारी, त्यांच्या आर्थिक परिथितिनुसार व पतीनुसार लावण्यांत येते व ही प्रतवारी सरकारच्या अर्थखात्याशीं विचारविनिमय करून वारंवार तपासली व सुधारली जाते. मालाची प्रतवारीहि चार गटांत करण्यांत येते; कच्च्या मालाची किंमत त्याची आयात करणारा देश सहज देऊं शकेल ह्या भरंवशावर अशा मालास हप्ताहि हलका असतो. एका टोंकाला कच्चा माल व दुसऱ्या टोंकाला चैनीच्या जिनसा ह्यांचे दरम्यान बाकीचा इतर माल येतो. आर्थिक अडचणींची पहिली झळ चैनीच्या जिनसांस लागते, म्हणून त्यांवर हप्ता सर्वांत भारी असतो. मालाची किंमत मिळण्याच्या अटींत एका टोंकास 'कॅश अगेन्स्ट डॉक्युमेंटस' म्हणजे "रोख रक्कम देतांच मालावरील मालकी दाखविणारे कागद-पत्र ताब्यांत मिळण्याची" अट तर दुसऱ्या टोंकास सहा महिन्यांची उधारी, अशी अट असते, आणि उधारीचा काळ लांबत जाईल तसा हप्ता वाढत जातो. पहिल्या प्रतीच्या देशांकडे पाठविल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या रोखीच्या व्यवहारास शेंकडा ४ शिलिंग हप्ता बसला, तर उधारीच्या व्यवहारास तो शेंकडा १७ शि. ६ पे. बसतो. अगदीं कनिष्ठ दर्जाच्या देशांकडे जावयाच्या कच्च्या मालास अनुक्रमें शेंकडा १२ शि. व ३१ शि. ६ पे. हप्ता बसतो. माल खपण्याची शक्यता जेवढी कमी, तसा त्यावरील हप्ता वाढत जातो.

यंत्रसामुग्रीसारख्या भांडवली स्वरूपाच्या मालास दीर्घकाळाची उधारी दिली असली म्हणजे त्याचा विमा वेगळ्या पॉलिसींखाली उतरविण्यांत येतो. हा माल एखाद्या विशिष्ट कारणासाठी खास बनविण्यांत आलेला आहे, का तो नेहेमींच्या पद्धतीचाच, कोठेंहि खपण्याजोगा आहे, ही गोष्ट हप्ता ठरवितांना महत्त्वाची असते. माल तयार करण्याची, त्याची डिलिव्हरी देण्याची व पैसे मिळ-ण्याची वेळ, ह्यांचाहि विचार करावा लागतो. चांगली पत असलेल्या देशांतील वसुलीच्या सुलभतेच्या अपेक्षेचे व्यवहारांस दरसाल शेंकडा १० शि. हप्ता बसला, तर कमी पतीच्या देशां-कडून व्हावयाच्या दीर्घ मुदतीच्या वसुलीच्या व्यवहारांस तो दरसाल शेंकडा २ ते ३ पौंडांपर्यंत वाढत जातो.

आयुष्याच्या, आगीच्या, इत्यादि इतर विम्यांप्रमाणें ह्या विम्यासाठीहि ब्रोकर्स किंवा दलाल ह्यांची मदत घेण्यांत येते. निर्गत करणाऱ्या कित्येक व्यापाऱ्यांना ह्या प्रकारच्या संरक्षणाचा फायदा कसा घ्यावयाचा त्याचें ज्ञान नसतें. अर्थात, हें तांत्रिक ज्ञान असणारे दलालहि फार थोडे आहेत. त्यांची संख्या

वाढणें हें व्यापारी व एक्सपोर्ट क्रेडिट्स गॅरंटी खातें ह्या दोघांच्याहि हिताचें होईल. एक्सपोर्ट क्रेडिट इन्शुअरन्सचा, म्हणजे निर्गत व्यापारांतील येण्याच्या विम्याचा, अद्याप पुरेसा उपयोग केला जात नाहीं. ग्रेटब्रिटनच्या एकूण निर्गतीपैकीं फक्त १४·६% निर्गत ह्या विम्याच्या संरक्षणाखालीं चालते. सरकारी खात्यानें उपलब्ध करून दिलेल्या सोईचा फायदा ज्यास्त प्रमाणांत घेतला गेला, तर ग्रेटब्रिटनची निर्गत वाढण्यास पुष्कळच मदत होईल.

निर्गत व्यापारांत निघणाऱ्या येण्याचा विमा भारतांत प्रचारामध्यें नसणें स्वाभाविक आहे; कारण क्रेडिट इन्शुअरन्सचें शास्त्रच आपल्या इकडे अपरिचित आहे. पतीच्या आधुनिक साधनांचा उपयोग करून आर्थिक व्यवहार वाढविण्याची हातोटी आपल्याला अजून साध्य करून घेतां आलेली नाहीं. ह्यासंबंधांत आम्हीं २९ जुलैच्या "अर्था"च्या अंकांत लिहिलें आहेच; म्हणून त्याची पुनरुक्ति न करतां फक्त त्याकडे लक्ष वेधणें पुरें होईल.

---

### हैड्रोजन बाँबचा आर्थिक हिशोब

गेल्या महिन्याच्या आठ तारखेला रशिआचे पंतप्रधान मि. मॅलेंकॉव्ह ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, हैड्रोजन बाँब तयार करण्याची मक्तेदारी आतां फक्त अमेरिकेपाशींच राहिलेली नाहीं. त्यानंतर १२ ऑगस्टला रशिआनें हैड्रोजन बाँबचा स्फोट केल्याचें खुद्द अमेरिकन सरकारनेंच जाहीर केलें. पण तत्पूर्वी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्रि मि. डलेस व इतर कांहीं प्रमुख अमेरिकन ह्यांनीं रशिअन हैड्रोजन बाँबबद्दल शंका प्रदर्शित केली होती. ह्या शंकेला आधारभूत म्हणून अशी माहिती प्रसिद्ध करण्यांत आली होती कीं, हैड्रोजन बाँब तयार करण्यासाठीं जितकी वीज पाहिजे तितकी रशिआंत तयार होत नाहीं. रशिआंत सध्यां १३,३०० कोटी किलोवॅट अवर्स वीज तयार होते; तर अमेरिकेंत ३७,००० कोटी किलोवॅट अवर्स तयार होते. विजेच्या उत्पादनाचा हिशोब लक्षांत घेतां रशिअन हैड्रोजन बाँबविषयीं शंका येणें साहजिक वाटतें. तथापि लंडनमधील कांहीं वृत्तपत्रांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, असा हिशोब करणें लहान मुलालाच शोभण्यासारखें आहे. रशिआ अमेरिकेइतकें पोलाद निर्माण करूं शकत नाहीं म्हणून त्याला अमेरिकेइतकी टँक्स अगर लष्करी विमानें तयार करतां येणार नाहींत असा अंदाज केला तर तो जितका चूक ठरेल तितकाच वरील हिशोब चूक ठरेल. कारण, रशिआंत उत्पादन होणारी वीज अमेरिकेंतल्याप्रमाणें चैनीच्या वस्तू तयार करण्यांत अगर श्रम वांचविण्याच्या नव्या युक्त्या शोधण्यांत खर्च होत नाहीं. म्हणजे, विजेचा उपयोग कसा करण्यांत येतो यावर हैड्रोजन बाँबला लागणारी वीज रशिआंत आहे कीं नाहीं ह्या प्रश्नाचें उत्तर अवलंबून आहे. अमेरिकेंत पोलादाचा उपयोग धोब्याचीं यंत्रें, मोटारी अगर रिफ्रिजरेटर्स तयार करण्यासाठीं करतात. त्याच प्रमाणांत रशिआंत तो करण्यांत येत नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

### भारतीय विद्यापीठांना मदत

अमेरिकेकडून भारतानें कर्जाऊ रकम घेऊन तिचा विनियोग गहू खरेदी करण्यासाठीं केला. ह्या कर्जावर भारताला जें व्याज यावें लागतें त्याचा एक निधि करण्यांत आला असून त्या निधींतून समाजोपयोगी कार्यांना मदत करण्यांत येत असते, भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत विद्यापीठांच्या विकासासाठीं कांहीं रकम खर्च करण्यांत येत आहे.' विद्यापीठांना यावयाच्या ह्या आर्थिक मदतीच्या कार्यक्रमास अनुसरून वरील फंडांतून कलकत्ता विद्यापीठाला तात्पुरती मदत देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. मदत सुमारें १,५६,२५० रुपयांची देण्यांत येणार असून ती अमेरिकन पुस्तकें व शास्त्रीय उपकरणें ह्यांच्या रूपानें देण्यांत येईल. कलकत्ता विद्यापीठानें आपल्या गरजा मध्यवर्ती सरकाला कळविल्या आहेत. सरकारकडून वरीलपैकीं जें साहित्य विद्यापीठाला मिळेल तें विद्यापीठाशीं संलग्न असणाऱ्या कॉलेजांना वाटून टाकण्यांत येणार आहे. निरनिराळ्या विद्यापीठांचीं वाचनालयें अधिक समृद्ध करणें, त्यांच्या प्रयोगशाळा सुधारणें, इत्यादि कामें वरील फंडांतून करण्यांत यावयाचीं आहेत. त्याशिवाय अमेरिकन विद्यापीठांना पुस्तकें आणि प्रयोगशाळेचें साहित्य बदला म्हणून पुरविणें' असाहि निधीचा उद्देश आहे. भारतामधून विद्यार्थी अमेरिकेंत शिक्षणासाठीं जातात. त्यासाठीं शिष्यवृत्त्याहि मिळतात. परंतु शिकून परत आलेले विद्यार्थी भारतीय परिस्थितीशीं समरस होत नाहींत, असें पुष्कळ वेळां आढळून येतें. तेव्हां भारतीय विद्यापीठें आणि अमेरिकन विद्यापीठें ह्यांच्यांत शैक्षणिक सहकार्य उत्पन्न झाल्यास तें अधिक उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीनें वरील योजना पहिलें पाऊल म्हणून स्वागत करण्यासारखी आहे.

---

### स्विट्झरलंडमध्यें दारूवर होणारा खर्च

स्विट्झरलंडमधील लोक इतर देशांतील लोकांच्या मानानें कमी मद्य घेणारे आहेत असें म्हणतात. तथापि झ्यूरिच येथें ह्या विषयासंबंधीं जे आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, स्विट्झरलंडमधील लोकांना दूध, फळांचे रस ह्या पेयांपेक्षा दारूचा अंश असणारीं पेयें अधिक आवडतात. ह्या अहवालावरून अशी माहिती मिळते कीं, स्विट्झरलंडमधील लोक दरवर्षी ९१ कोटी रुपये दारूवर खर्च करतात. म्हणजे, दरवर्षी दरडोई २२१ रुपये इतकी रकम त्या देशांत दारू आणि इतर तत्सम पेयांवर खर्च होते. दुधावर जितकी रकम दरवर्षी खर्च होते त्याच्या दुप्पट वरील खर्च आहे. स्विट्झरलंडमध्यें दरवर्षी होणाऱ्या बचतीच्या रकमेच्या दुप्पटीपेक्षा थोडी अधिक इतकी ही रकम होते. मोटारींच्या गुन्ह्यांबाबत कोर्टांनीं आरोपींना जितक्या शिक्षा गेल्या वर्षी सुनावल्या त्यांपैकी ५८ टक्के शिक्षा खूप दारू पिऊन गाडी हांकण्याबद्दल दिलेल्या होत्या. अशा मोटार-मालकांचे परवाने रद्द करण्यांत आले. मानसिक रोग्यांच्या इस्पितळांचा एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. एकूण रोग्यांच्या संख्येपैकीं २६ टक्के रोगी प्रमाणाबाहेर दारू पिण्यामुळें इस्पितळांत दाखल करून घेण्यांत आले असें दिसून आलें. स्विट्झरलंडची एकूण लोकसंख्या सुमारें ४०,००,००० आहे. त्यांपैकीं ६०,००० लोक दारुडे या सदरांत घालण्याइतपत दारू पितात असें म्हणतात. स्विट्झरलंडमध्यें दारू पिण्याचें व्यसन वाढत असल्यानें त्याविरुद्ध उपाय योजणें सरकारला भाग पडूं लागलें आहे. उलटपक्षीं, दारू ही निर्यातीची एक महत्त्वाची वस्तु असल्यामुळें तिचें उत्पादन वाढविणेंहि जरूर झालें आहे; अशी परस्परविरोधी परिस्थिति उत्पन्न झाली आहे.

## सरकारी कर्जें

**जी. पी. नोटा, स्टॉक सर्टिफिकिटें व एस्. जी. एल्. खातें**

प्रॉमिसरी नोटा, स्टॉक सर्टिफिकिटें आणि सबसिडिअरी जनरल लेजर अकाउंट ह्या तीन प्रकारांत रक्कम गुंतवून सरकारी कर्जरोखे घेतां येतात. १९५२–५३ मध्यें १४·१५ कोटी रुपयांच्या प्रॉ. नोटांचें स्टॉक सर्टिफिकिटांत रूपांतर करून घेण्यांत आलें व ५·६२ कोटी रुपये किंमतीच्या स्टॉक सर्टिफिकिटांच्या फिरून प्रॉ. नोटा करवून देण्यांत आल्या. बँका, विमा कंपन्या, इत्यादि संस्था रोख्यांचे कागद न मागता, रिझर्व्ह बँकेच्या सबसिडिअरी जनरल लेजर अकाउंटमध्यें कर्जरोख्यांचें खातें ठेवणें पसंत करतात. सरकारच्या एकूण कर्जापैकी ५०% कर्ज अशा लेजर अकाउंटमध्येंच हिशेबांत आहे. खालील तक्त्यांत कर्जाची प्रॉ. नोटा, स्टॉक सर्टिफिकिटें, एस्. जी. एल्. अकाउंट व इतर अशी वर्गवारी दाखविली आहे.

**सरकारी कर्जाची वर्गवारी (%)**

| ३१ मार्च | जी. पी. नोटा | स्टॉक सर्टिफिकिटें | एस्. जी. एल्. अकाउंट | इतर (लंडनमध्यें असलेल्या जी.पी. नोटा, स्टॉ. स.) |
|---|---|---|---|---|
| १९४२ | ५३·६९ | १५·४० | ३०·५७ | ०·३४ |
| १९४३ | २५·६० | ३१·२८ | ४२·८५ | ०·२७ |
| १९४५ | ३७·०५ | २५·९५ | ३६·८५ | ०·१४ |
| १९४८ | ३३·०४ | २०·९४ | ४५·९९ | ०·०३ |
| १९५१ | ३२·३७ | १७·७३ | ४९·८७ | ०·०३ |
| १९५२ | ३३·१९ | १७·६१ | ४९·१८ | ०·०२ |
| १९५३ | ३२·९३ | १६·२५ | ५०·८० | ०·०२ |

---

**पूना बँकिंग असोसिएशनचे नियोजित कार्यक्रम**

दि पूना बँकिंग असोसिएशनतर्फें प्रकाशित व्हावयाच्या "बँकर्स वार्षिका" ची तयारी पुरी झाली आहे. ह्या पुस्तकास शेठ प्राणलाल देवकरण नानजी, इंडियन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. भारतांतील दूरदूरच्या ठिकाणच्या लहान–मोठ्या बँकांनीं पुस्तकांत छापण्यासाठीं जाहिराती पाठविल्या आहेत, आणि छपाईचें काम संपत आलें आहे. व्याख्यानमालेचे मुख्य पाहुणे युनायटेड कमर्शिअल बँकेचे जनरल मॅनेजर श्री. बी. टी. ठाकूर हे असून त्यांच्याशीं समारंभाच्या तारखांबाबत पत्रव्यवहार चालू आहे.

---

**भारत इं. बँकेच्या इमारतीचा वास्तुशांत–समारंभ**

भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें, च्या लक्ष्मी रोडवरील नव्या इमारतीचा वास्तुशांत–समारंभ बुधवार, दि. २ सप्टेंबर ह्या दिवशीं होणार आहे. सकाळीं ७ वाजतां सनईवादन, ७–४२ वाजतां वास्तुप्रवेश, त्यानंतर होमहवन इत्यादि विधी, रात्रौ ८–३० वाजतां रावसाहेब पी. डी. कुलकर्णी ह्यांचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन, ९–३० वाजतां श्री. खळदकर ह्यांचें सनईवादन, इत्यादि कार्यक्रम आखलेला आहे.

---

**दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर**

"अर्था"च्या २६–८–५३ च्या अंकांत वरील बँकेची माहिती दिली आहे, तींत बँकेच्या नफ्याची रक्कम ४,०५७ रु. दिली आहे. वास्तविक तो आकडा १९५१–५२ सालाबाबतचा असून, १९५२–५३ चा नफा ५,४६० रु. ७ आ. ५ पै आहे. ही चूक दाखवून दिल्याबद्दल आम्ही बँकेचे आभारी आहों.

## सोविएत युनियनमधील सहकारी संस्था

सोविएत युनियनमध्यें सहकारी–संस्थांचे तीन प्रकार आहेत. ग्राहकांच्या सहकारी संस्था, औद्योगिक किंवा उत्पादकांच्या सहकारी संस्था आणि अपंग लोकांच्या सहकारी संस्था.

**ग्राहकांच्या सहकारी संस्था** या ग्रामीण विभागांत व्यापार करणाऱ्या संघटना असतात. या सामुदायिक स्वरूपाच्या संस्था असून त्यांची सभासदसंख्या सुमारें सव्वा तीन कोटींच्या घरांत आहे. त्यांची व्यवस्था निवडून दिलेल्या व्यवस्था–मंडळामार्फत होत असते. या ग्राहकांच्या सहकारी संस्थांचीं विभागांची, प्रादेशिक व प्रजासत्ताक फेडरेशन्स असतात.

या ग्राहकांच्या सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची परिषद् भरते व सोविएत युनियनच्या सहकारी संस्थांची मध्यवर्ति युनियनची निवडणूक त्या परिषदेंत होत असते. त्याचप्रमाणें नियंत्रण–मंडळाची व हिशेबतपासणी मंडळाचीहि निवड याच परिषदेमध्यें करण्यांत येत असते. ही परिषद् दर चार वर्षांनीं भरत असते.

ग्राहकांच्या सहकारी संस्थांना सरकार नियोजित पद्धतीनें तयार मालाचा पुरवठा करीत असतें. त्याखेरिज या सहकारी संस्था स्वतःहि निरनिराळा माल विकत घेत असतात. शेतकऱ्यांच्या कच्च्या मालावर संस्करण करण्याचे छोटे कारखानेहि या ग्राहकांच्या सहकारी संस्था चालवीत असतात आणि कित्येक प्रकारचा नित्योपयोगी मालहि तयार करतात.

सहकारी संस्थांच्या व्यापाराचें व्यापक जाळें पसरलेलें असतें. देशभर या सहकारी संस्थांमार्फत २,२६,००० किरकोळ विक्रीचीं दुकानें, हजारों चहाचीं व फराळाचीं दुकानें व विश्रांतिगृहें चालू आहेत.

सोविएत सहकारी संस्थांची मध्यवर्ति युनियन आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेमध्यें सामील झालेली आहे व ती त्या संघटनेमधील सर्वांत मोठी घटक होय.

**औद्योगिक सहकारी संस्था** या हस्तव्यवसायांतल्या कारागिरांची संघटना होय. त्यांच्यामार्फत अनेक कारखाने व व्यवसाय-केंद्रें चालू असतात, तसेंच या सहकारी संस्थांचीं स्वतःचीं विक्री-भांडारेंहि असतात. या सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक–मंडळांची निवडणूक त्या संस्थांचे सभासद करतात.

**अपंग लोकांची सहकारी संस्था** ही युद्धांत किंवा अपघातांत अपंग झालेल्या लोकांची संघटना असून या लोकांना पूर्वीचा व्यवसाय करणें शक्य नसल्यामुळें त्यांना नवीन व्यवसायाचें शिक्षण देण्याची या संस्थांमार्फत व्यवस्था केली जाते. हें शिक्षण चालू असतांना त्यांना निर्वाहासाठीं भत्ता देण्यांत येत असतो.

नवीन व्यवसायाचें शिक्षण घेऊन झाल्यावर हे अपंग लोक सहकारी संस्थांच्या कारखान्यांतच किंवा स्वतंत्रपणें कामाला लागतात. सहकारी संस्थांच्या कारखान्यांत काम केल्यास त्यांना पगाराप्रमाणेंच एकंदर नफ्यांतहि वांटा मिळत असतो. माजी सैनिकांना सरकारकडून मिळत असलेल्या पेन्शन्सना या त्यांच्या कमाईमुळें प्रत्यवाय येत नसतो.

सर्व सहकारी संस्थांना सोविएत सरकारचें सर्वतो साह्य लाभत असतें.

---

**साखरेच्या कारखान्यांनीं लक्ष द्यावें—डॉ. जे. एन्. मुखर्जी** ह्यांनीं मुंबई येथें दिलेल्या व्याख्यानांत असें सांगितलें कीं, उसापासून गूळ आणि खांडसारी साखर तयार करण्याच्या सदोष पद्धतीमुळें भारताचें दरवर्षी १०० कोटी रुपयांचें नुकसान होत आहे. भारतामधील शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग ह्या विषयावर ते बोलत होते.

## श्री. लक्ष्मणरावजींच्या यशाचें मर्म

( लेखक : श्री. शं. वा. किर्लोस्कर )

प्रसिद्ध महाराष्ट्रीय कारखानदार श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्यासारख्या व्यक्तींच्या यशामुळें जगाचे डोळे दिपून जातात. पण त्या यशाचा जन्म किती दीर्घ कालापूर्वी तिच्या अंतःकरणांत झाला असतो हें मात्र कुणालाहि दिसून येत नाहीं. अगदीं लहानपणींच त्या व्यक्तीला स्वतःची ओळख होऊन त्याची चैतन्यशक्ति इष्ट दिशेनें स्फुरण पावूं लागते. या अंतस्थ भांडवलावरच तो आपला व्यापार सुरू करतो.

### निष्कांचन लक्ष्मणराव मुंबईंत दाखल

लक्ष्मणराव दहा—बारा वर्षांचे असतां, त्यांचे सर्वांत वडील बंधु व शिक्षक श्री. रामुअण्णा यांच्याजवळ शिक्षणासाठीं कलादगी येथें राहत असत. शाळेच्या अभ्यासांत लक्ष्मणरावांचें लक्ष वेताचें, पण एक दिवस त्या गांवीं एक गृहस्थ कापडाची गिरणी सुरू करण्याच्या इरादानें आले. १८८० च्या सुमाराची ही गोष्ट. त्या गृहस्थाच्या व्याख्यानाचा ठसा लक्ष्मणरावजींच्या मनावर फार बसला. त्यांची जन्मजात यांत्रिक विषयाची आसक्ति ह्या व्याख्यानानें जागृत झाली. त्यांच्या बालमनानें त्याच क्षणीं ठरविलें कीं, आपण एक यांत्रिक व्हावयाचें आणि वयाचीं सोळा वर्षें होतात न होतात तोंच यांत्रिक ज्ञान मिळविण्यास खिशांत एक कपर्दिका नसलेल्या स्थितींत ते मुंबईस दाखल झाले!

या शिक्षणासाठीं त्यांनीं पडेल तें काम व लागतील ते कष्ट केले. यंत्र हेंच त्यांचें उपास्य व त्याचींच त्यांना स्वप्नें. एक बुद्धिमान् व कल्पक यंत्रज्ञ म्हणून हळूहळू त्यांना सर्वजण ओळखूं लागले. व्ही. जे. टी. इन्स्टिट्यूटमध्यें त्यांना प्रथम ड्रॉइंग टीचर व नंतर स्टीमचे प्रोफेसर म्हणून नेमणूक मिळाली.

पण लक्ष्मणरावांची महत्त्वाकांक्षा तेवढ्यावर समाधान पावणारी नव्हती. त्यांना कारखानदार व्हायचें होतें. १४ वर्षें नोकरी झाल्यावर त्यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला. काड्याच्या पेट्या, बटनें, चाकू—कात्र्या, कागदी डब्या, अशा वस्तु तयार करण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें. हे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत म्हणून ते डगमगले नाहींत. शिखरावर जायला एक पाऊलवाट सांपडली नाहीं, तर दुसरी शोधून काढायची हा त्यांचा निश्चय.

### यशोगिरीची वाट सांपडली

त्यांनीं सुरू केलेलें सायकलचें दुकान बेळगांवला बरें चाललें, पण त्यांची दृष्टि वर लागलेली. या तंद्रींत असतांना त्यांना एक नवीनच कल्पना स्फुरण पावली. सायकलचें दुकान विकून टाकून त्यांनीं लोखंडी नांगर करायला १९०४ सालीं सुरुवात केली. ते शोधीत असलेली वाट त्यांना सांपडली.

तथापि त्यांचा ठळकवाडीला सुरू केलेला कारखाना कुठें मूळ धरतो न धरतो तोंच तो तिथून हलवावा लागला. औंधचे राजेसाहेब या वेळीं साह्याला आले. औंध संस्थानच्या हद्दींत कारखाना नेण्याचा लक्ष्मणरावांनीं तावडतोब निर्णय घेतला. बाब लहान असो, वा मोठी असो, त्याबद्दल निर्णय घ्यायला लक्ष्मणराव कधींहि वेळ घेणार नाहींत. निश्चय करायचा तो झटपट आणि त्याप्रमाणें तावडतोब कामाला लागायचें हें त्यांचें खास तंत्र!

कुंडलजवळच्या निर्जन व निर्जल माळावर कारखाना व वाडी वसवावयाचें काम म्हणजे एक प्रतिसृष्टि निर्माण करण्याचेंच. इतरांना हें केवढें संकट वाटलें असतें, पण लक्ष्मणरावांची खात्री ही कीं, प्रत्येक संकट एक नवी संधि घेऊन येत असतें, तेव्हां त्याचें स्वागत उत्साहानेंच केलें पाहिजे. किर्लोस्करवाडीला कारखाना तर स्थापायचाच पण पाश्चात्य देशांतील कांहीं प्रसिद्ध कारखान्यांप्रमाणें कामगारांसाठीं सुखसोयींनीं सज्ज अशी नमुनेदार औद्योगिक वसाहतहि त्याच्या शेजारीं वसवायची. विलायतच्या कारखानदारांची आपल्याला बरोबरी करायची तर त्यांच्या जेवढ्या नवनव्या कल्पना व पद्धति आपल्याला उचलतां येतील, तेवढ्या आपण उचलल्या पाहिजेत; आपण औद्योगिक क्षेत्रांत शक्य तितकें अग्रयावत् राहिलें पाहिजे हें लक्ष्मणरावजींचें कायमचें धोरण. कारखान्याला स्वतःचें मासिक असावें हीहि एक अशीच आधुनिक कल्पना.

### कामकऱ्यांचे आवडते 'पप्पा'

कारखान्याच्या चालकाच्या अंगीं पुढाऱ्याचे गुण असावे लागतात. त्याला माणसांची अचूक परीक्षा करतां आली पाहिजे. कुणाची कुठें योजना करायची याचें त्याला चांगलें ज्ञान हवें. सर्वांत एकजूट व हुरूप उत्पन्न करण्याची त्याला हातोटी असावी लागते. सर्वांत विशेष म्हणजे आपल्या तालमींत नवीं लायक माणसें तयार करतां आलीं पाहिजेत. लक्ष्मणरावजींचा सर्वांस फार दरारा वाटे. त्यांची शिस्तहि तशीच कडक! तथापि सणण्णा घणकऱ्यापासून वर्क्स सुपरिंटेंडेंट शंभूराव जांभेकर या सर्वांची त्यांजवर अनन्यभक्ति व प्रेम. कारखान्यांत लहानथोर सर्वजण त्यांस 'पप्पा' या नांवानें संबोधीत. हेंच त्याचें खास प्रतीक.

अशा चालकाला मनोधैर्यहि असामान्य असावें लागतें. त्याच्या कसोटीचे प्रसंग सारखे येत असतात. किर्लोस्करवाडीच्या सुरुवातीच्या काळांत एक दिवस एक धिप्पाड माणूस हातांत कुऱ्हाड घेऊन झिंगलेल्या स्थितींत वाडींत शिरला व मंडळींना दमदाटी करूं लागला. पुढें जाण्याची कुणाची छाती होईना; इतक्यांत लक्ष्मणराव तिथें आले व त्या माणसाचें मनगट पकडून एक असा गुद्दा चढवला कीं, त्याची निशा तेव्हांच उतरून लक्ष्मणरावांचे त्यानें पाय धरले! दुसरा एक त्यांच्या धैर्याचा प्रसंग सांगायचा तर मुंबईच्या एका गव्हर्नरच्या भेटीचें प्रकरण. वाडीला पूर्वीं दोन गव्हर्नर येऊन गेले होते; पण या वेळीं देशांत असंतोषाच्या ज्वाला भडकल्या होत्या. गव्हर्नरसाहेबांची भेट या वेळीं लक्ष्मणरावांस नकोशी वाटली व गव्हर्नरसाहेबांना सरळ बेत रद्द करण्याबद्दल कळविण्यांत आलें. याबद्दल अर्थात् खूप जळफळाट उडाला, पण लक्ष्मणरावांनीं त्याला दाद दिली नाहीं!

### सततोद्योगाची मूर्ति

लक्ष्मणराव म्हणजे सततोद्योग असें समीकरण मांडायला मुळींच हरकत नाहीं व जें काम हातीं घ्यायचें त्याचा पिच्छा पुरवून उद्दिष्ट शेवटाला नेल्याशिवाय ते कधीं स्वस्थ बसणार नाहींत. मग तें काम नवा कारखाना सुरू करायचें असो, नवें यंत्र करायचें असो, कारखान्याजवळच्या ओढ्याला धरण घालायचें असो, नाहीं तर कामगारांसाठी पतपेढी स्थापन करायचें असो; आणि जें काम करायचें तें नावीन्यपूर्ण प्रकारें, सुधारणायुक्त व बिनचूक झालें पाहिजे, हा कटाक्ष.

त्यांच्या तोंडचें नेहमींचें आवडतें वाक्य म्हणजे "When the unit is correct, the whole must be correct."

## कारखाना लिमिटेड केला

अशा प्रकारचें लक्ष्मणरावजींचें नेतृत्व लाभल्यामुळें कारखाना सर्व अडचणींतून डोकें वर काढूं शकला व त्याला चिरस्थाई स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी १९२० सालीं त्यांनीं त्याचें लिमिटेड कंपनींत रूपांतर केलें. पण त्या वेळीं त्यांनीं कारखान्याच्या जिंदगीची जी प्रत्यक्ष किंमत झाली तिच्यापेक्षा स्वखुषीनें कमीच किंमतीचे शेअर घेतले ही गोष्ट इतरांस अवगत नाहीं. तसेंच भागीदारांना विवक्षित टक्के डिव्हिडंड देतां आल्याशिवाय मॅनेजिंग एजंटनीं नफ्यांतील कांहीं वांटा घ्यायचा नाहीं हाहि त्यांनीं स्वतःच दंडक घालून घेतला. धंद्यांतील उच्च नीति व पत यांना लक्ष्मणराव डोळ्यांत तेल घालून जपत. किर्लोस्कर कारखान्याचा व्यवहार अत्यंत सरळ व चोख असतो हा लौकिक लक्ष्मणरावांच्या व्यापारांतील धोरणाचीच फलनिष्पत्ति आहे!

पन्नासांपेक्षा जास्त वर्षें लक्ष्मणरावजींनीं अशी अखंड औद्योगिक तपश्चर्या केली. तिचें सार्थक म्हणजेच किर्लोस्करवाडी, पुणें, हरिहर, बंगलोर व लोणावळें येथील पांच कारखाने होत हें कुणाला निराळें सांगायला नको. हें त्यांचें प्रत्यक्ष कार्य; पण त्याबरोबरच या पांची कारखान्यांमुळें ३,००० पेक्षा जास्त कुटुंबांना चरितार्थाचें साधन मिळून कारखान्यांच्या स्थावर जिंदगीची किंमत १ कोटीवर गेली आहे. ओगलेवाडीच्या कांचकारखान्यांना मिळालेली प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रेरणा यांचीं साकल्यानें विचार केल्यास लक्ष्मणरावजींचें यश केवढें अपूर्व आहे याची प्रत्येकास कल्पना येईल.

## निर्लेप सात्त्विक आचरण

एवढें प्रचंड कार्य व राष्ट्राची अमोलिक सेवा करून लक्ष्मणरावांच्या साध्या राहणींत अथवा सात्त्विक वृत्तींत काडीमात्र फरक झाला नाहीं. सुपारीच्या खांडाचीहि त्यांना संवय नाहीं. जन्मांत ते पत्यांना शिवले नाहींत. मग धूम्रपानाची गोष्ट कशाला? कोणत्याहि संस्थेच्या नेत्याचें आचरण असें निर्लेप असल्यावर हाताखालच्या लोकांनीं कसें वागावें याबद्दल त्याला उपदेश करावा लागत नाहीं. लक्ष्मणरावजींना मनःस्वास्थ्य मिळविण्यास हातांतली हातोडी सोडून पोथी अथवा जपमाळ घेण्याची कधीं जरूर भासली नाहीं. तथापि त्यांनीं कर्मयोगाची खरी उपासना केली आहे, म्हणून त्यांनीं इतके कारखाने काढले, देशाच्या औद्योगिक विकासाला एवढा मोठा हातभार लावला, तरी स्वतःचें वय होऊन विश्रांतीचा समय येतांच या सर्व व्यापांतून अलिप्त होऊन पुढच्या पिढीच्यों हातीं त्यांनीं सूत्रें दिलीं. आतां आपलें उर्वरित आयुष्य एका साध्या शेतकऱ्याप्रमाणें ते शांततेनें घालवीत आहेत. "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" या गीतेच्या दिव्य संदेशाचें असें उत्कृष्ट प्रतीक इतरत्र पाहायला मिळेल काय? लक्ष्मणरावजींच्या यशाचें मर्म त्यांच्या या श्रेष्ठ व पराक्रमी वृत्तींत आहे.

(संपदा, ऑगस्ट १९५३)

**म्हैसूरमधील तळ्यांतून गंगेंतील मासे**—गंगा नदीमधील १० हजार जिवंत मासे कलकत्त्याहून बंगलोरला विमानानें धाडण्यांत आले आहेत. म्हैसूरमध्यें शिमोगा जिल्ह्यांत जी समाज-विकास योजना चालू करण्यांत आली आहे, तीमधील तळ्यांतून ते सोडण्यांत येणार आहेत. कलकत्त्यामधील फिश सीड सिंडिकेट ह्या संस्थेनें भारत सरकारच्या सांगण्यावरून ते पाठविले आहेत.

## राजकारण सोडून अर्थकारण बोला

संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अन्न आणि शेती-संघटनेचे माजी डायरेक्टर जनरल लॉर्ड बॉइड ओर ह्यांनीं कोपनहेगन येथें एक भाषण करून असें सुचविलें कीं जगांतील अन्नाचें उत्पादन वाढविण्यासाठीं पाश्चिमात्य राष्ट्रांनीं रशिआशीं बोलणीं सुरू करावी. सर्व जगाचें मिळून एक सरकार स्थापन करण्यासाठी जी चळवळ करण्यांत येत आहे तिची परिषद् कोपनहेगन येथें भरली होती. परिषदेला ३० राष्ट्रांचे मिळून ४०० प्रतिनिधी गेलेले होते. लॉर्ड बॉइड परिषदेंतील आपल्या भाषणांत म्हणाले कीं, जगांतील भुकेल्या लोकांना पाश्चिमात्य देशांत असलेलीं सर्व स्वातंत्र्यें आणि चार भाकऱ्या ह्यामधील कोणती गोष्ट पाहिजे असें विचारलें तर ते भाकऱ्या पसंत करतील. भांडवलशाही आणि कम्युनिझम ह्यांच्याबद्दल नित्य बोलत रहाण्यापेक्षां आपण धान्य आणि लांकूड ह्यांच्याबद्दल चर्चा सुरू करून रशिआला शेती सुधारणेवर विचार करण्यासाठीं पाचारण करूं या. पुष्कळजण असें म्हणतात कीं पाश्चिमात्य राष्ट्रें अशीं बोलणीं करण्यास तयार आहेत, पण रशिआ बोलणीं करण्यास येणारच नाहीं. पण मला असें वाटत नाहीं. मला हें माहीत आहे कीं रशिआला असें बोलावणेंच करण्यांत आलेलें नाहीं. राजकारण आणि अर्थकारण ह्यांचे धागेदोरे एकमेकांत बेमालूम गुंतलेले असतात, हें तर लॉर्ड बॉइड ह्यांच्या भाषणांवरून स्पष्ट होतेंच; पण राजकारण सोडून अर्थकारणावर लक्ष केंद्रित केलें गेल्यास जगांतील अत्यंत अवघड प्रश्न सुद्धां सुटूं शकतील असा विश्वास त्यांच्या भाषणांत दिसून येतो. आर्थिक व्यवहारासंबंधीं बोलणी करण्यानें खऱ्या परिस्थितीवर प्रकाश पडतो आणि राजकारण उलगडणें सोपें होतें, हें निश्चित.

**भारत-अमेरिका सहकार्य**—भारतामधील शेतकरी कुटुंबांत राहून काम करण्यासाठीं २१ अमेरिकन शेतकरी भारतांत येणार आहेत. सौराष्ट्रामधील श्री. भूपतराय त्रिवेदी हे गेले सहा महिने अमेरिकन शेतकरी कुटुंबांत राहून काम करीत आहेत. त्यांच्याच बरोबर वरील अमेरिकन शेतकरी येणार आहेत. सध्या २० भारतीय तरुण अमेरिकन शेतकरी कुटुंबांत रहात आहेत.

**कलकत्ता शहरांत भूमिगत रस्ता**—कलकत्ता शहरांतील एसप्लेनेड जंक्शनजवळ पादचारी लोकांसाठी एक भूमिगत रस्ता तयार करण्याचें प. बंगाल सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं १ लाख रुपये खर्च येणार असून रस्ता तयार करण्याची योजना कॉर्पोरेशनकडे धाडण्यांत आली आहे. योजनेचा कांहीं खर्च कॉर्पोरेशन करणार आहे.

**प्रे. आयसेनहोअर ह्यांचा नकार**—अमेरिकेंतील सिनेमागृहांच्या तिकिटावर २० टक्के कर घेण्यांत येतो. हा कर रद्द करणारें एक बिल अमेरिकन काँग्रेसनें मोठ्या मताधिक्यानें मंजूर केलें होतें, पण प्रे. आयसेन होअर यांनीं त्यावर सही करण्याचें नाकारलें आहे. कराच्या रूपानें दरवर्षी १०,००,००,००० डॉलर्सचें उत्पन्न होतें, तें गमावणें सरकारला परवडणार नाहीं, असें त्यांचें मत आहे.

**संत तुळशीदासांचें स्मारक**—उत्तर प्रदेशांत राजापूर येथें उभारण्यांत यावयाच्या संत तुळशीदास ह्यांच्या स्मारकासाठीं १० लाख रुपये खर्च येणार आहे. ह्याच गांवीं तुळशीदासांचा जन्म झाला असें निश्चित सांगतां येण्यासारखें नसलें तरी राजापूरला त्यांचा बराच काळ गेलेला असल्यामुळें तेंच गांव स्मारकासाठीं मुक्रर करण्यांत आलें आहे.

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें १

### को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा जून १९५३

महाराष्ट्र सहकारी विद्यालयाच्या १२ व्या शिक्षणक्रमाची परीक्षा गेल्या जूनमध्यें झाली होती. सदर परीक्षेचा निर्णय नुकताच जाहीर झाला. परीक्षेस बसलेल्या एकूण ४६ विद्यार्थ्यांपैकी एकूण ३६ विद्यार्थी पास झाले. म्हणजे पासाचें प्रमाण शें. ७८ इतकें पडतें. पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं १ पहिल्या वर्गात, २३ दुसऱ्या वर्गात व १२ तिसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. पास झालेल्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत.

१ ला वर्ग—पाटील शंकर नारायण

२ रा वर्ग—आसवले गु. पां., बंडगर दि. पां., भोसले रा. शं., चपाले बा. म., गाडवे ल. स्वा., घागरे दा. गो., घोरपडे शं. द., जोशी त्रिं. वि., कदम म. दि., केदारी वि. मा., कोळी शा. वि., कुलकर्णी गो. द., कुंभार बा. बा., मुसळे शं. का., पाटणकर ना. कृ., पाटील बा. मो., पाटील पां. दौ., पाटील शि. रा., फडके पु. बा., शाळीग्राम दि. ग., शिर्के व. शि., ठाकूर कि. जु., वाणी त्रिं. ना.

३ रा वर्ग—देसाई शि. ल., घोरपडे शा. रा., काकडे भ. सा., काकडे वि. ज., काटकर व. ए., कुलकर्णी पां. अ., मोरबाळे आ. ता., पाटील पां. सु., पाटील श्री. ना., ठकार ना. ग., भोसले अ. बा., कोदूळगांवकर रा. शं.

मा. वि. मदाने
सुपरिंटेंडेंट

---

### सांगली ॲग्रि. प्रो. मार्केट कमिटीच्या इमारतीचा कोनशिला-समारंभ

दि ॲग्रिकल्चरल प्रोडयूस् मार्केट कमिटी, सांगली (द. सातारा) च्या सांगली-मिरज रस्त्यालगत अक्वायर केलेल्या नवीन मार्केट यार्डचे विस्तृत जागेवर ऑफिस इमारतीच्या पायाची कोनशिला बसविणेचा समारंभ शुक्रवार ता. २१ ऑगस्ट १९५३ रोजीं सकाळीं १०-१५ वाजतां मे. पां. ज. चिन्मुळगुंद, आय. सी. एस., रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज व डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग व रूरल फायनान्स, मुंबई राज्य, पुणें, यांचे हस्तें अत्यंत उत्साहानें पार पडला. मार्केट कमिटीचे चेअरमन आमदार श्री. वसंतराव पाटील यांनीं जमलेल्या पाहुण्यांचें स्वागत करून सुमारें गेल्या दोन वर्षांत मार्केट कमिटीनें केलेल्या कामाची त्रोटक माहिती सांगितली. श्री. बापूसाहेब कालेकर, वकील, यांनीं मंत्री, उपमंत्री, मुंबई इलाख्यांतील मार्केट कमिट्या व इतर सद्‌गृहस्थ यांचेकडून आलेल्या अंदाजें २५ शुभ संदेशांचा उल्लेख केला. समारंभास सांगलीचे श्रीमंत राजेसाहेब, कलेक्टरसाहेब, स्वामी रामानंद भारती, आमदार व्ही. टी. पाटील, डि. एल. बी. प्रेसिडेंट श्री. आर. जे. पाटील, नगराध्यक्ष श्री. वा. आ. चव्हाण, एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर श्री. आडके, आमदार मामासाहेब लिंग्रज, आमदार दत्ताजीराव सूर्यवंशी, आमदार बॅरिस्टर जी. डी. पाटील, तसेंच कोल्हापूर, कऱ्हाड, तासगांव येथील मार्केट कमिटीचे मेंबर्स व सांगली, मिरज व आसपासचे गांवांतील सर्व निमंत्रित व प्रतिष्ठित व्यापारी मंडळी व नागरिक हजर होते. सदर समारंभास एकूण अंदाजे ४००-५०० मंडळी हजर होती. मे. चिन्मुळगुंदसाहेब यांचें अध्यक्षीय भाषण झालेनंतर उपस्थित असलेल्या पाहुण्यांचे श्री. शंकरराव गाडवे यांनीं हार्दिक आभार मानले.

---


बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

## नोटीस

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि० ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २० सप्टेंबर १९५३ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या साने मेमोरियल हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९५२-५३ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफावाटणी मंजूर करणें, पुढील सालासाठीं डायरेक्टर्स, चेअरमन, व्हाईस-चेअरमन निवडणें, हिशेब तपासनिसांच्या तपासणी यादींचा विचार करणें, लोकल ऑडिटर नेमणें, वगैरे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करणें वगैरे कामें होतील व त्याच दिवशीं सदर ठिकाणीं सकाळीं ८ ते १२ वाजेपर्यंत व्यक्तिमात्र डायरेक्टरांची व १० ते १२ वाजेपर्यंत सोसायट्यांतर्फेचे डायरेक्टरांची निवडणूक होईल. तरी सदर निवडणुकीस व सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

बार्शी,
११ ऑगस्ट १९५३

मा. वि. विश्वरूपे
चेअरमन
बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि०


---


दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

## भागदारांस नोटीस

बँकेच्या भागदारांची छत्तिसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २०-९-१९५३ रोजीं सकाळीं ७ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. या सभेंत सन १९५२-५३ चा अहवाल, ताळेबंद व नफा-वांटणी मंजूर करणें, (१) श्री. श्री. म. कुलकर्णी (२) श्री. पु. पां. गोखले (३) श्री. प्र. ल. करवेळकर (४) श्री. गो. रा. काळे या उमेदवारांतून तिघांची बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर निवडणूक करणें, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती, ऑडिटर्सची नेमणूक, वगैरे विषयांचा विचार करणें, वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ७-३० ते दुपारीं १२-३० अशी आहे. तरी बँकेच्या सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

कराड,
तारीख २५ ऑगस्ट १९५३

शं. पु. कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.


---


## औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरीसाठीं ट्रेनिंग क्लास

पुणें जिल्ह्यांतील सर्व प्रकारच्या औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरीसाठीं व नवीन होतकरू व्ह. फा. पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां ट्रेनिंग क्लास ता. १८।९।५३ पासून ३१।१०।५३ अखेर १॥ महिन्याचा चालणार आहे. तरी गरजूंनीं ३ रुपये प्रवेश-फी व अर्ज मे. के. बी. देशपांडे, को. ट्रे. इन्स्पेक्टर, १४८७ शुक्रवार पेठ, पुणें २ या पत्त्यावर ता. १० सप्टेंबर पर्यंत पाठवावेत. कोणत्याहि सबबीवर प्रवेश-फी परत मिळणार नाहीं. राहण्याचा व जेवण्याचा खर्च ज्याचे त्यांनीं स्वतंत्र करावयाचा आहे. परीक्षेंत पास झाल्यास व सोसायटींत कमींत कमी ३ वर्षें नोकरी करीन असा करार करून देणाऱ्या कामावर असलेल्या सेक्रेटरींना ५०/- रुपये मदत मिळेल. जास्त माहिती समक्ष अगर पत्रद्वारें करावी.

सही—जयवंतराव तुकाराम सावंत
चेअरमन
पुणें जिल्हा सहकारी बोर्ड, लि. पुणें.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५११ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८०३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.